पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : २४ • नोव्हेंबर २०१२ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

**गुणवंत कामगार पुरस्कार २०११-१२ साठी विहित नमुन्यातील अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालय येथे दि.१ ते १५ डिसेंबर,१२ अखेर कार्यालयीन वेळेत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. पूर्ण भरलेले अर्ज संबंधित खातेप्रमुखांच्या शिफारशीसह दि.३१/१२/१२ अखेर पाठवावयाचे आहेत.**

## छत्रपती संभाजी राजे उद्यान येथे किल्ले स्पर्धा व प्रदर्शन

पुणे महानगरपालिका उद्यान विभागाचे वतीने सन १९९२ पासून दिपावलीच्या निमित्ताने किल्ले स्पर्धा व प्रदर्शन आयोजित केले जाते. मुलांना महाराष्ट्रात असलेल्या अनमोल किल्ल्यांचा अभ्यास करता यावा, त्याबद्दल मुलांच्या मनात आवड निर्माण व्हावी, इतिहास-भुगोलाची आवड वृध्दिंगत व्हावी या उद्देशाने पुणे महानगरपालिका प्रत्येक वर्षी ही स्पर्धा छत्रपती संभाजीराजे उद्यान येथे आयोजित करण्यात येते. या वर्षी दिपावलीच्या निमित्ताने दिनांक १० ते १८ नोव्हेंबर, १२ पर्यंत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक १०/११/२०१२ रोजी मा. सौ. वैशाली बनकर, महापौर, पुणे यांचे हस्ते झाले. स्पर्धेचे परिक्षण मा. श्री. निनाद बेडेकर, इतिहास तज्ञ, मा. श्री. आनंद पाळंदे, मा. डॉ. सुरेश गरसोळे, भुगोल तज्ञ, मा. श्री. जगजीवन काळे, मा. उदय मुळे व मा. कैलास चौधरी यांनी केले. पारितोषिक समारंभ दिनांक १०/११/२०१२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मा. श्री. पराग करंदीकर, संपादक, महाराष्ट्र टाईम्स यांचे हस्ते संपन्न झाला. सदरच्या कार्यक्रमास वृक्ष प्राधिकरणाचे मा. पृथ्वीराज सुतार, मा. सुषमा निम्हण, इत्यादी सदस्य तसेच मा. श्रीमती निलमताई खाडे, सभासद, पुणे मनपा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. श्री. पृथ्वीराज सुतार यांनी केले.

उद्घाटनानंतर सदरचे प्रदर्शन दिनांक १० ते १८ नोव्हेंबर अखेर सकाळी ८.३० ते रात्री ८.३० पर्यंत नागरिकांना विनामुल्य पाहण्यासाठी खुले ठेवण्यात आले होते.



या प्रदर्शनामध्ये शालेय विद्यार्थी, वेगवेगळ्या संस्था तसेच हौशी नागरिकांनी सहभाग घेतला. या वर्षी या प्रदर्शनास फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळालेला असून, या स्पर्धेसाठी सुमारे ७९ किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनामध्ये प्रामुख्याने सिंहगड, राजगड, शिवनेरी, जंजिरा, साल्हेर, सिंधुदुर्ग, सूर्यगड, लोहगड, तुंग, मुरुड, खांदेरी, विजयदुर्ग, तोरणा, प्रतापगड, दुर्गलिंगाणा, देवगिरी, मोहरानगड, ढाकबहिरी, काल्पनिक किल्ला, रोहिडा, आग्रा, व्हाईट कॅस्टल, डॉलोगोरॉ डॉक, इत्यादी किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. किल्ल्यांचे नकाशे, किल्ल्यांवर व पर्यावरणावर आधारित घोषवाक्य, इत्यादीमुळे किल्ल्यांबाबतची अधिक माहिती मिळत होती. शंभुगर्जना प्रतिष्ठान यांच्या विजयदुर्ग या किल्ल्याच्या प्रतिकृतीस सर्वोत्कृष्ट किल्ला पारितोषिक देण्यात आले. तसेच, प्रत्येक गटातील विजयी स्पर्धकांना पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

## पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचातर्फे मंगळागौर कार्यक्रम संपन्न

पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचातर्फे महापालिका अधिकारी/सेवकांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

२५ नोव्हेंबर, २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या वर्धापन दिनाच्या प्रसंगी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे मंगळागौर या मऱ्हाठमोळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये महापालिकेतील विविध विभागांमधील २२ महिला सेविकांनी सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम श्री. सुरेश परदेशी यांच्या दिग्दर्शनाखाली सादर करण्यात आला. महिला सेविकांना प्रशिक्षण देण्यासाठी पुरंदर तालुक्यातील श्रीमती गंगुबाई सांगळे व श्रीमती सुभद्रा मांढरे या ग्रामीण कलाकारांचा मोठा हातभार लाभला.



कार्यक्रमाचे उद्घाटन मा. ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले. सांस्कृतिक कलामंच समितीचे अध्यक्ष तथा सल्लागार (कामगार) मा. शिवाजी दौंडकर, सदस्य सचिव तथा कामगार कल्याण अधिकारी श्री. नितीन केंजळे व महानगरपालिकेतील विविध अधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंगळागौरीच्या आरतीने झाली. त्यानंतर झिम्मा फुगड्या, खिसबाई खिस, उखाणे, विविध प्राण्यांवर आधारित खेळ, इत्यादी प्रकारांचा त्यात समावेश करण्यात आला होता. श्रीमती अनुराधा कोकरे, श्रीमती रश्मी सोरटे, श्रीमती गंगुताई सांगळे, श्रीमती मांढरे यांनी गाण्यांची दोर सांभाळली. श्री शिंगरे, श्री. साबळे व श्रीमती वृषाली गायकवाड यांनी या कार्यक्रमास वाद्यवृंदाने साथ दिली.

सदर कार्यक्रमानंतर श्रीमती रश्मी एकबोटे यांच्या नेतृत्वाखाली हिंदी-मराठी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये डॉ. रेखा कोकरडे, श्रीमती छाया जातेगावकर, श्री. महादेव जाधव, श्री. उत्तम बनसोडे, डॉ. राजेंद्र जोशी, श्री. आयुबखान पठाण, श्री. दिपक एकबोटे, श्री. राम साठे या कलाकारांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात जुन्या हिंदी गाण्यापासून झाली. हिंदी गाणे काळाच्या ओघात कसे बदलत गेले ते या कार्यक्रमातून कलाकारांनी स्पष्ट केले.

यापुढे सांस्कृतिक कलामंचातर्फे अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये सर्व मनपा कर्मचाऱ्यांनी सहभाग वाढविणेबाबत सेवकांना आवाहन करण्यात आले.

## कॉ. आप्पासाहेब भोसले यांचा स्मृतिदिन साजरा

पुणे महापालिका कामगार युनियनचे दिवंगत कामगार नेते अप्पासाहेब भोसले यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिनांक १९/११/२०१२ रोजी पीएमसी एम्प्लॉईज युनियन व पुणे महानगरपालिका गणेशोत्वस समितीच्या वतीने मनपा मुख्य भवनामध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन मा. महापालिका आयुक्त श्री. महेश पाठक यांनी केले. सदर रक्तदान शिबिरामध्ये १२२ मनपा अधिकारी/सेवकांनी रक्तदान केले.



## प्रामाणिक कर्मचारी - कांताबाई चाबुकस्वार



रस्त्यावर सापडलेले अडिच तोळ्याचे सोन्याचे गंठण महापालिकेच्या ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कर्मचारी महिलेने परत केले. त्यामुळे ऐन दिवाळीत दु:खात बुडालेल्या महिलेच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटली.

ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालया कडील सफाई कर्मचारी श्रीमती कांताबाई चाबुकस्वार या रस्त्यावर झाडण काम करत असताना त्यांना एक पाकीट सापडले. त्यात सोन्याचे गंठण होते. चाबुकस्वार यांनी तात्काळ याची माहिती आरोग्य निरीक्षक श्री. मधुकर पाटील व मुकादम श्री. सुनील डाळिंबे यांना दिली. दोघेजण ते गंठण ताडीवाला रस्ता पोलिस चौकीत देण्यासाठी निघाले होते. दरम्यान, जवळच असलेल्या वस्तीत एका महिलेचा रडण्याचा आवाज त्यांना आला. त्यामुळे त्यांनी चौकशी केल्यानंतर श्रीमती सुशीला मुकदूम या आपल्या भावाकडे भाउबिजेला आल्या असून, त्या दूध आणण्यासाठी गेल्या असता त्यांचे गंठण असलेले पाकीट हरविल्याचे त्यांना समजले. श्रीमती चाबुकस्वार यांना सापडलेले गंठण हे श्रीमती मकदूम यांचेच असल्याचे खात्री पटल्यानंतर त्यांना ते परत देण्यात आले. श्रीमती चाबुकस्वार यांच्या प्रामाणिकपणाबद्दल ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्री. संदीप ढोले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संपादकीय...

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देवून खरे स्वराज्य साकार होणार नाही तर सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व जनतेमध्ये येईल तेंव्हाच खरे स्वराज्य निर्माण होईल या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारामधून खरे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रतिबिंबीत होते. जनतेचे हित सर्वश्रेष्ठ असल्याने नागरिकांना माहिती देणे अनिवार्य आहे, हा विचार करुन संयुक्त राष्ट्रसंघाने १९४६ साली मुलभूत माहिती अधिकाराचा ठराव संमत केला.

त्यानंतर ही संकल्पना जगभर रुजविण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमार्फत जगभर प्रसार केला. याचाच एक भाग म्हणून १९९७ साली मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये भारतात या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. याचा अंतिमत: परिणाम म्हणून भारतात तामिळनाडू, राजस्थान, महाराष्ट्र, दिल्ली, इत्यादी राज्यांनी माहिती अधिकार अधिनियम संमत करुन त्याची अंमलबजावणी सुरु केली.

भारतीय जनतेला अत्यंत प्रभावीपणे माहिती मिळण्याच्या दृष्टीने हा अधिनियम अधिक पुरोगामी, सर्व समावेशक व अर्थपूर्ण असला पाहिजे, असे सरकारने योजले होते. सुरळीतपणे व अत्यंत प्रभावीपणे माहिती मिळविण्यासाठी राष्ट्रीय सल्लागार परिषदेने व इतरांनी सुचविलेल्या शिफारशींचे परीक्षण केल्यानंतर भारत सरकारने या कायद्यात अनेक बदल करण्याचे ठरविले. यानुसार प्रस्तावित बदल विचारात घेवून माहितीचे स्वातंत्र्य अधिनियम, २००२ निरसित करण्याचे व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ अन्वये मान्य केलेला माहितीचा अधिकार अंमलात आणण्यासाठी एक परिणामकारक चौकट तयार करण्यासाठी कायदा अधिनियमित करण्याचे ठरविले.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू करण्यापूर्वी भारतामध्ये ब्रिटीशकालीन गुप्ततेचा अधिनियम, १९२३ अंमलात होता. या अधिनियमामधील तरतुदी विचारात घेता गोपनियतेच्या नावाखाली कुठल्या प्रकारची माहिती जाहीर करणे किंवा उपलब्ध करुन देण्यात येत नव्हती. भारतातील विविध घटक राज्यांनी केलेले स्वतंत्र माहिती अधिकार अधिनियम आणि गुप्ततेचा कायदा यामधील तरतुदी परस्पर विसंगत होत्या. याशिवाय भारतातील सर्व राज्यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या कार्यक्षेत्रामध्ये आणण्यासाठी एका स्वतंत्र कायद्याची आवश्यकता होती. विविध घटक राज्यात अस्तित्वात असलेले कायदे, त्यांच्या विभिन्न तरतुदी यामध्ये सुसंगती व एकसूत्रता आणून सर्व भारतासाठी एकच सर्वसमावेशक अधिनियम आणणेकामी व कारभारात पारदर्शकता येवून जनतेला माहिती मिळणेसाठी भारताने माहिती अधिकार अधिनियम अंमलात आणला. मा. राष्ट्रपतीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून हा कायदा जम्मू-काश्मिर वगळून सर्व भारतात अंमलात आला. यामुळे अस्तित्वातील शासकीय गुप्तता अधिनियम, १९२३ चे महत्व एकदम कमी झाले. शासन यंत्रणा अधिकाधिक पारदर्शक, प्रतिसादक्षम व कार्यक्षम बनून भ्रष्टाचार व लाल फितीचा कारभार कमी होण्याची अपेक्षा आहे. या कायद्यामुळे शासकीय माहिती जनतेला खुली झाली असून एका नव्या लोकशाहीचा उदय झाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या केंद्रीय कायद्यामुळे विविध राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या स्वतंत्र माहिती अधिकार अधिनियम संपुष्टात आले. या अधिनिमामध्ये एकूण ११ प्रकरणे असून, ३१ कलमांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. भारतामध्ये जे विविध अधिनियम अस्तित्वात आहेत त्या अधिनियमांमधील तरतुदींची अंमलबजावणी सर्वसामान्य जनतेकडून करण्यात येते आणि त्यांचे नियंत्रण सरकारी यंत्रणा करत असते. परंतु माहिती अधिकार अधिनियम असा एकमेव अधिनियम आहे की ज्याची अंमलबजावणी सरकारी यंत्रणेने करणे बंधनकारक आहे आणि त्याचे नियंत्रण सर्वसामान्य जनतेच्या हातामध्ये देण्यात आलेले आहे. या अधिनियमाचा प्रमुख उद्देश शासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे, शासन लोकाभिमुख बनविणे, सर्वसामान्य जनतेच्या हितावर परिणाम करणाऱ्या धोरण आणि निर्णयांची माहिती जनतेस देणे आणि भ्रष्टाचार कमी करणे, इत्यादी आहेत. माहिती अधिकार अधिनियम हा अधिकार सर्वसामान्य जनतेला देण्यात आलेला आहे. त्यामध्ये लहाणमोठे, गरीबश्रीमंत, सुशिक्षित अशिक्षित, अंधअपंग, इत्यादीबाबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यात आलेला नाही. जन्माला आलेले मुल किंवा वयोवृध्द नागरिक या कायद्याचा वापर करु शकतील.

कोणत्याही शासकीय संस्थेचा कारभार नागरिकांकडून करुपाने संकलित होणाऱ्या निधीवर अवलंबून असतो. त्यामुळे भारतीय राज्य घटनेमध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक नागरिकाला माहिती मिळविण्याचा मुलभूत हक्क आहे. या बाबी विचारात घेवून लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या नागरिकांसाठी केलेला हा अधिनियम निश्चितपणे मैलाचा दगड म्हणून इतिहासामध्ये ओळखला जाईल. तथापि, नागरिकांनी या अधिनियमाचा वापर करताना सार्वजनिक हिताचे भान ठेवून वैयक्तिक लाभासाठी याचा वापर करणेकामी काही काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच, शासन दरबारी काम करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या अधिनियमातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## ओळख गुणवंताची - श्री. संजय पांडुरंग मोरे

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. संजय मोरे, जनसंपर्क अधिकारी यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. मोरे यांचे प्राथमिक शिक्षण पांडवनगर येथील संत रामदास विद्यालयात झाले. दहावीपर्यंतचे शिक्षण शिवाजीनगर येथील भारत इंग्लिश स्कुल या शाळेत झाले. आठवीमध्ये असताना अभ्यासात हुषार असूनही वाईट संगतीमुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्याने ते अनुत्तीर्ण झाले. परिणामी कुटुंब व समाजाकडून त्यांचेकडे दुर्लक्ष होत गेले. आपण एकाकी पडलो आहोत या भावनेतून मनातून खच्ची न होता यातून सुधारण्याची व काम करीत शिक्षण घेण्याची श्री. मोरे यांनी मनाशी खुणगाठ बांधली. चतु:श्रृंगी परिसरातील श्री. मेनन यांचेकडे घरातील किरकोळ कामे शालेय सुट्टीमध्ये दरमहा पंधरा रुपयाने ते करु लागले. यातूनच पैसे कमविणे व शिक्षण घेणे या मंत्राचा त्यांच्या मनावर परिणाम झाला.

कोथरुड परिसरातील किर्लोस्कर फिल्टर्स या कंपनीत शालेय सुट्टीत ५ रुपये रोजंदारीने सफाई कामे करण्यास त्यांनी सुरुवात केली. पहाटे ४ वाजता जीवाचा आटापिटा करुन, कधी पायी तर कधी सायकलने चतु:श्रृंगी ते किर्लोस्कर कंपनी असा प्रवास त्यांना करावा लागे. कंपनीतील झाडणकाम, रस्तेसफाई, बागकाम, कार्यालयीन पडेल ती कामे करावी लागत. आयुष्यातील पहिला पगार रु. २९ त्यांना मिळाला.

दहावी अकरावीच्या सुट्टीमध्ये पिंपरी चिंचवडमधील काही कंपन्यांमध्ये त्यांनी कामे केली. पिंपरी येथील जे.जी.ग्लास कंपनीत ठेकेदारामार्फत पाच रुपये रोजाने काम केले. आगीच्या भट्टीतून काचेचे तयार झालेले ग्लास, बाटल्या बाहेर काढणे व पुढील प्रक्रियेकरिता पाठविणे असे कामाचे भयाण स्वरुप होते. त्यानंतर भारत बॉक्स कंपनीत काम करण्याची संधी मिळाली. लहानमोठ्या आकाराचे लाकडी बॉक्स तयार करण्याची कला या ठिकाणी अवगत झाली.

सन १९८० मध्ये पहिल्याच प्रयत्नात ते दहावी उत्तीर्ण झाले. पूर्वी केलेली कामे, आलेले अनुभव बरेच काही सांगून गेले होते. कामे करीत असताना शिक्षण चालू ठेवले. मिळणाऱ्या पगारातून स्वत:चा शैक्षणिक खर्च करु लागले. तसेच घरखर्चासही हातभार लागला. त्यामुळे पैसा, घरखर्च, व्यवहार ज्ञान याबरोबरच शिक्षणाचे महत्वही कळू लागले. बारावीच्या परीक्षेच्या काळात बजाज टेम्पो या कंपनीत स्टोअर क्लार्क या पदावर नोकरीची संधी मिळाली. परंतु प्रत्यक्षात स्टोअर पार्ट डिपार्टमेंटमध्ये हेल्पर म्हणून काम करावे लागले. दरम्यान ते बारावी उत्तीर्ण झाले. प्रथमवर्ष कलाशाखेत मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेतला.

श्री. मोरे यांना शिक्षणाची ओढ होती. परंतु कौटुंबिक आर्थिक कारणास्तव नोकरी करणे अत्यंत महत्वाचे होते. कुटुंब मोठे होते. घरात फक्त आईच नोकरी करत होती. वडिल सेवानिवृत्त होते. आईचे कष्ट व धडपड त्यांनी जवळून पाहिली. घरातील आर्थिक अडचण त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. असे असताना समाज कल्याण खात्याकडून नोकरी करिता कॉल मिळाला. मुलाखत दिली व ३ सप्टेंबर, १९८३ पासून पुणे लष्कर पाणीपुरवठा केंद्र येथे फिल्टर ऑपरेटर या पदावर त्यांना नोकरी मिळाली. नोकरीची काळजी व पर्यायाने आर्थिक विवंचना संपुष्टात आली. परंतु शिक्षण थांबवावे लागेल याची खंत त्यांना होती. त्यावेळी खात्यामधील उप विभागीय अधिकारी श्री.एस.व्ही.तांदळे यांनी श्री. मोरे याना पुढील शिक्षण पूर्ण करणेविषयी मार्गदर्शन केले. शिफ्ट ड्युटी असल्यामुळे ओढाताण करीत सन १९८५ साली ते बी.ए.उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते विवाहबध्द झाले. कर्मचारी पतपेढीतून लग्नाकरिता कर्ज काढले होते. त्यामुळे घरखर्च, कर्जफेड यांची जुळवाजुळव करत शिक्षण थांबविण्याचा विचार त्यांनी केला होता. परंतु आई व पत्नी यांनी शिक्षण चालू ठेवण्यास प्रोत्साहन दिले.

श्री. मोरे यांना लहानपणापासूनच



सामाजिक कार्याची आवड होती. आपल्या परिसरात काहीतरी ठोस कार्य करावे या सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून त्यांनी आनंद यशोदा मित्रमंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्विकारला. मंडळाचे रजिस्ट्रेशन करवून घेतले, महिला संघटन, गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ, क्रिडा, विविध गुणदर्शन, पल्स पोलिओ शिबीरे, महिला आरोग्य शिबीरे, समाजमंदिर उभारणी, शैक्षणिक, व्यावसायिक मार्गदर्शन, कायदेविषयक मोफत सल्ला, पोलिस चौकी - न्यायालय स्तरावर गरजू लोकांना सहकार्य व मार्गदर्शन, कामाच्या ठिकाणी कामगारांचे प्रश्न हाताळणे, कामगार संघटन, कामगारांना मार्गदर्शन, विविध योजनात सहभाग, प्रौढ साक्षरता वर्गाचे आयोजन, विविध योजनांची माहिती देणे, कामगारांचे विनामोबदला अर्ज भरणे, पॅनकार्ड, ओळखपत्र बनवून देणे, इ.विविध स्वरुपाची कामे नि:स्वार्थपणे केली. सन १९९१ ते २००० पर्यंत परिसरातील पहिली ते नववीपर्यंत विद्यार्थ्यांकरिता कमल प्रभा संस्कार केंद्रांतर्गत मोफत संस्कार वर्ग चालू केले. दरवर्षी साधारणपणे ४०-५० मुलामुलींनी याचा लाभ घेतला.

समाजकार्य व नोकरी करत असतानाच बी.ए.,एल.एल.बी., डी.एल.एल.ॲण्ड एल.डब्ल्यू., डी.सी.जे., एम.पी.एम., एल.एस.जी.डी., एल.जी.एस. इ.शिक्षण त्यांनी पूर्ण केले. तसेच, फिल्टर इन्स्पेक्टर, सॅनिटरी इन्स्पेक्टर, जनता संपर्क अधिकारी या पदापर्यंत निस्वार्थ सेवेने मजल मारली. जनसंपर्क अधिकारी अतिशय जोखमीचे, संवेदनक्षम काम आहे. यामध्ये सातत्याने जागृत रहावे लागते. नागरिक, प्रशासन व प्रसारमाध्यमे यांच्याशी सतत संपर्कात राहून परिस्थिती काहीही असली तरी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून उत्तम समन्वय राखून काम करावे लागते. प्रसारमाध्यमांशी संपर्क, वृत्त तयार करुन पाठविणे, समन्वय राखणे, प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या नेमक्या गरजा काय हे जाणून प्रशासनाशी त्यांचा उत्तम समन्वय व मैत्रीपूर्ण संबंध राखणे अशा प्रकारे श्री. मोरे यांची आजवर वाटचाल चालू आहे. जनसंपर्क अधिकारी हे पद नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे पद असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क, संवाद. कामाचे निराकरण, समन्वय राखणे, माहितीची देवाणघेवाण करणे, इत्यादी महत्वपूर्ण कामे करावी लागतात. या कारकिर्दीत दूरदर्शन मालिका - सावधान अपघात होत आहे, चित्रपट - श्वास, मनपा कर्मचारी निर्मित माहितीपट - फ्लायओव्हर अशा निर्मिती प्रसंगी शक्य तितके सहकार्य व योगदान त्यांनी दिले आहे. नागरिकांच्यो माहितीकरिता प्रशासनातील महत्वाचे विषय, विविध विभागांची माहिती, कामकाज, माहिती अधिकार अधिनियम, खुले ग्रंथालय, लोकशाही दिन या संदर्भातील महत्वपूर्ण माहिती मुलाखतीद्वारे, आकाशवाणीद्वारे श्री. मोरे यांनी दिली आहे. वर्तमानपत्राद्वारे देण्यात येणाऱ्या जाहिरातींचे काही प्रसंगी बातमीत रुपांतर करुन त्यानुसार मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देवून महापालिकेचे कोट्यावधी रुपये वाचविले आहेत. मनपातील अधिकारी/सेवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंच स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला आहे.

सन २०१० पासून श्री. मोरे यांनी चतु:श्रृंगी परिसरात वधुवर सूचक मंडळ सुरु केले. मुलामुलींचे लग्न, पालकांना भेडसावणारे प्रश्न, मुले, मुली व पालक यांची घुसमट, मार्गदर्शन व समन्वयाचा अभाव, घरातील गरीबी, असुरक्षित वातावरण, नातेवाईकांची फरफट, एकमेकांतील भांडणे, कौटुंबिक आधार नसणे, तर एकीकडे उच्चशिक्षित, श्रीमंत परंतु समाजापासून दूर असलेला वर्ग अशा सर्व परिस्थितीचा अभ्यास करुन परिसरातील यशोदानंद ज्येष्ठ नागरिक संघ व आनंद यशोदा मित्र मंडळ यांचे योगदानाने ३ जानेवारी २०१० रोजी त्यांनी वधुवर सूचक केंद्र सुरु केले. कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला न घेता केंद्राचे कामकाज सुरु आहे. सदर केंद्रामार्फत आजपर्यंत जवळपास ४०० पेक्षा अधिक लग्ने झालेली आहेत.

श्री. मोरे यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून सुमारे २३ वेळा रक्तदान केले आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, कामगार कल्याण क्षेत्रातील निस्वार्थ सेवेबद्दल जनजागृती पुरस्कार, आदर्श कार्यकर्ता महाराष्ट्र राज्य पुरस्कार, राष्ट्रमित्र पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाउ साठे स्मृती पुरस्कार, पुणे महानगरपालिका गौरवपदक, आय.सी.एस.पुरस्कार, आदर्श सेवाभावी कार्यकर्ता पुरस्कार, राष्ट्र सेवा पुरस्कार, कै.राजीव गांधी पुरस्कार, महाराष्ट्र रत्न पुरस्कार, कार्यक्षम शासकीय अधिकारी पुरस्कार, रेड ॲन्ड व्हाईट पुरस्कार, आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, नि:स्वार्थ समाजसेवक पुरस्कार, निष्ठावंत कार्यकर्ता पुरस्कार, गुणवंत कामगार पुरस्कार, इत्यादी पुरस्कार मिळालेले आहेत.

अशाप्रकारे श्री. मोरे यांचा सफाई कामगार ते जनसंपर्क अधिकारी हा प्रवास व उत्कृष्ट कार्याचा उंचावत जाणारा आलेख नक्कीच उल्लेखनीय व सर्व सहकाऱ्यांना आदर्श घालून देणारा व प्रेरक निश्चितच आहे.

त्यांच्या या अतुलनीय कार्यास व पुढील वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

# गुणवंत कामगार सन २०१०-११ - अल्प परिचय

**डॉ.राजेंद्र नारायण जोशी, क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय**- क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी या पदावर कार्यरत. कार्यक्षम व कार्यतत्पर अधिकारी. औंध क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सर्व रस्ते कन्टेनरमुक्त करण्यात मोठा सहभाग. पुण्यामध्ये स्वाईन फ्ल्यूची साथ यशस्वीपणे आटोक्यात आणण्यामध्ये महत्वपूर्ण कामगिरी. स्वाईन फ्ल्यूबाबत प्रबोधनात्मक ३० कार्यक्रम आयोजित करुन जनजागृती केली. कचरा निमुर्लन करण्यासाठी औंध परिसरातील ३५० सोसायट्यांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण करुन खत प्रकल्पास सुरुवात केली. ओला कचरा जागेवर जिरवल्याने ३० टन ओला कचरा वाहतुक कमी होवून मनपाची दररोज ३०-३५ हजार रुपयांची बचत करण्यात मोलाची कामगिरी.

**श्री.संजय निवृत्ती घावटे, आरोग्य निरिक्षक, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय**- रखवालदार ते आरोग्य निरिक्षक असा प्रवास. प्रामाणिक, कार्यक्षम व कर्तव्यदक्ष कर्मचारी. रॅगपिकर्सची प्रथमत: टिंगरेनगर भागातून सुरुवात करुन कंटेनरमुक्त भाग केला. कचरा व्यवस्थापनात ओला-सुका कचरा वर्गीकरण, हिरव्या व पांढऱ्या कचरा बकेट्सचे वाटप, घंटागाडीचे नियोजन तसेच जनजागृतीसाठी पथनाट्य व व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन. पालखीच्या आगमन काळात स्वागत कक्षाचे नियोजन, पालखी मार्गावर स्वच्छता देखरेख व सेवकांस मोफत भोजनाची सोय. धानोरी परिसरात साफसफाईचे काम चालू असताना रस्त्याच्याकडेस सापडलेली श्री.शहा यांची हरविलेली रु.४ लाखांची बॅग प्रामाणिकपणे कोणतेही बक्षीस न घेता स्वाधिन केली.

**श्री.गुरुस्वामी रंगाप्पा तुम्माले, हॉर्टिकल्चरल सुपरवायझर उद्यान कार्यालय** - माळी पदावरुन हॉर्टिकल्चरल सुपरवायझर असा प्रवास. प्रामाणिक, कार्यक्षम व कर्तव्यतत्पर कर्मचारी. उद्यान विकसनामध्ये महत्वपूर्ण कामगिरी. उद्यानातील पालापाचोळा व जैविक कचऱ्याचे मोठ्या प्रमाणावर खतामध्ये रुपांतर करण्यात महत्वाची कामगिरी. खत विकत न घ्यावे लागल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत. पेशवे उद्यानामध्ये नर्सरी विकसित करुन जवळपास दीड लाख रोपे तयार केली. संभाजी उद्यान येथे फुले, फळे व भाजीपाला यांचे प्रदर्शन व सुशोभिकरणामध्ये सक्रिय सहभाग. नेहरु स्टेडियम येथील लॉन विकसित केले. उद्यानविषयक कार्याबद्दल विविध संस्थाकडून सन्मानित.

**श्री.लक्ष्मण बलभिम कादबाने, सि.ग्रे.लेखनिक आयातकर कार्यालय** - ज्यु.ग्रे.लेखनिक ते सि.ग्रे.लेखनिक असा प्रवास. प्रामाणिक, कर्तव्यदक्ष व कर्तव्यतत्पर कर्मचारी. सेवेत असताना बी.ए., एलएल.बी., जीडीसी अॅन्ड ए., एलएसजीडी, एलजीएस, डीएफएम इ. शैक्षणिक पात्रता धारण केली. कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालयात पेठ निरिक्षक पदावर कार्यरत असताना उच्चांकी करपात्र रक्कम वसूल केली. आयातकर कार्यालयाकडे गस्तीपथकामध्ये असताना रु.४५ लाख वसूली केली. सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा स्पर्धांमध्ये सक्रीय सहभाग.

**श्रीमती वर्षा बाजीराव मगदूम, दुय्यम शिक्षीका**- माध्यमिक शाळेत दुय्यम शिक्षिका म्हणून कार्यरत. १९८८ पासून इयत्ता १० वीचे विज्ञान विषयाचे निकाल ९५% पेक्षा जास्त. १९९८ मध्ये शैक्षणिक कार्याबद्दल शिक्षण मंडळ, पुणे मनपा यांचेकडून आदर्श शिक्षक पुरस्कार. खो-खो खेळासाठी राष्ट्रीय खेळाडू म्हणून ५ वेळा निवड. इ.१० वी तील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविल्याबाबत मा.महापालिका आयुक्त व मा.शिक्षण अधिकारी यांनी ७ वेळा सन्मान पूर्वक गौरवपत्र प्रदान. प्रत्येक वर्षी विज्ञान प्रदर्शनामध्ये विविध प्रकल्प विद्यार्थ्यांकडून तयार करुन सहभाग. विद्यालयास प्रशस्तीपत्रक प्राप्त.

**श्रीमती अनुराधा विजय कोकरे, ऑक्झलरी नर्स, आरोग्य खाते** - ऑक्झलरी नर्स या पदावर कार्यरत. कर्तव्यतत्पर व प्रामाणिक कर्मचारी. रुग्ण सेवेबरोबर समाजसेवा करण्याचा आगळावेगळ छंद. हसतमुख आनंदी चेहऱ्याने रुग्णांची प्रामाणिकपणे सेवा करणे व सुसंवाद साधून त्यांचे दु:ख हलके करण्यामध्ये उत्तम कामगिरी. भारुड, जोगवा, महाराष्ट्राच्या पारंपरिक कलेचे उत्तम सादरीकरण करण्यात सहभाग. अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, हुंडाबळी, मुलगी झाली हो मुलगी अशा अनेक विषयांवरील पथनाट्यातुन उत्तम अभिनय.

**श्री.संदिप प्रकाश मोरे, झाडूवाला, घनकचरा व्यवस्थापन कार्यालय** - झाडुवाला पदावर ६ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, कार्यक्षक व निर्व्यसनी कर्मचारी. सेवेत असताना एम.ए., एम.एस.डब्ल्यु., कामगार शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम, मराठी टंकलेखन इ.शैक्षणिक पात्रता धारण केली. पुणे मनपा कामगार युनियन व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या ओला सुका कचरा विभाजन मोहिमेत समन्वयक म्हणून महत्वपूर्ण कामगिरी. श्रमिक कला पथकामध्ये प्रबोधन कार्यक्रम करण्यासाठी गाणी व पथनाट्याची रचना केली. स्वयंरुपवर्धिनिच्या शैक्षणिक माध्यमातून चालणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग.

**श्री.रमेश अनंता जाधव, कचरा मोटार बिगारी, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय** - कचरा मोटार बिगारी या पदावर कार्यरत. कार्यक्षम व निर्व्यसनी कर्मचारी. स्वच्छता अभियानात महत्वपूर्ण कामगिरी. झोपडपट्टीतील गरीब विद्यार्थ्यांसाठी सन १९९८ पासून मोफत अभ्यासिका व संस्कारवर्ग चालवणे, ३४ खेड्यांमध्ये सायकल रॅलीद्वारे व्यक्तिमत्व विकास शिबिर चालविणे, व्यसनमुक्ती शिबिर भरविणे, अंधश्रध्दा, हुंडाबळी, एड्स या विषयावर पथनाट्याद्वारे जनजागृती करणे, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे इ. कामात महत्वपूर्ण कामगिरी.

**श्रीमती रतनबाई सुरेश धिमधिमे, झाडूवाली, टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय** - झाडुवाली पदावर १२ वर्षे कार्यरत. प्रामाणिक व कार्यक्षम कर्मचारी. हजेरी. स्वत:च्या कामाची जबाबदारी पार पाडताना रस्त्यात प्रसूत होणाऱ्या महिलेचा व तिच्या बाळाचा जीव वाचविला. श्रमिक कला पथकाबरोबर ओला सुका कचरा वर्गीकरणाबाबत समाज प्रबोधन केले. महिला आरोग्य परिषदेतर्फे सन्मानित.

**श्री.रविकांत किसन चव्हाण, बिगारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय** - बिगारी पदावर १६ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, नियमित व कर्तव्यतत्पर कर्मचारी. मोकादम स्पर्धेमध्ये द्वितिय क्रमांक. परिसर स्वच्छता, जनजागृती व समाज प्रबोधनाचे उत्कृष्ट कामाबाबत मा.महापालिका आयुक्त यांच्यामार्फत प्रशस्तिपत्रक. धानोरी परिसरात साफसफाईचे काम चालू असताना रस्त्याच्याकडेस सापडलेली श्री.शहा यांची हरविलेली रु.४ लाखांची बॅग प्रामाणिकपणे कोणतेही बक्षीस न घेता स्वाधिन केली.

**श्री.राजेंद्र हरि गायकवाड, बिगारी, घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय** - बिगारी पदावर ९ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, नियमित व कार्यक्षम कर्मचारी. ओला-सुका कचरा वर्गीकरण जनजागृती माहिमेत सक्रिय सहभाग. पालखी सोहळ्यात पालखी रोड व पालखी मुक्काम ठिकाणांची स्वच्छता केल्याबद्दल पुणे लॉयर्स कन्झुमरतर्फे सत्कार. मनपाच्या क्रिडा स्पर्धामध्ये सक्रिय सहभाग. शरीरसौष्ठव स्पर्धांमध्ये पारितोषिके व सन्मान. काम सांभाळून व्यायामशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असताना राष्ट्रीय पातळीवरील अनेक बॉडी बिल्डर घडविले. हॉटेल प्राईड व नांदे तलावाते मुला-मुलींना पोहण्याचे प्रशिक्षण दिले.

**श्रीमती प्रमिला आप्पाराव दळवी, झाडूवाली, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय** - झाडुवाली या पदावर ११ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, नियमित व कार्यक्षम कर्मचारी. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये सक्रीय सहभाग. प्रभारी मोकादम म्हणून प्रामाणिकपणे व कष्टाळूपणे काम करताना स्वाईन फ्लु, पल्स पोलियो, पूर नियंत्रण यासारख्या आपत्तीमध्ये महत्वपूर्ण कामगिरी. दोन्ही मुलांना उच्च शिक्षित केले.

**श्री.संतोष नामदेव घोटकुले, सुतार, नागरवस्ती विकास योजना कार्यालय** - सुतार पदावर ७ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, कार्यकुशल व नियमित कर्मचारी. पर्यावरण बचाव व वृक्षारोपण या विषयावर प्रबोधनपर कार्यक्रमात सहभाग. सामाजिक संघटनेच्या सहकार्याने एच.आय.व्ही., एड्स विरोधी पथनाट्याचे आयोजन, स्वच्छतेच्या दृष्टीने प्लॅस्टिक हटाव मोहिमेत ससहभाग.

**श्री.विलास दिगंबर ढोबळे, हेड गार्डनर, उद्यान कार्यालय** - हेड माळी या पदावर २१ वर्षे कार्यरत. प्रमाणिक, कार्यक्षम व कार्यकुशल कर्मचारी. विविध उद्यानामध्ये वृक्षांचे संवर्धन करणे, फळे, फुले विकसित करुन उद्यानास शोभा आणणे, वैकुंठ बागेत नवीन फ्लॉवर बेड तयार करुन घेण्यामध्ये महत्वपूर्ण कामगिरी. पर्यावरण जनजागृती कार्यासाठी मुख्य उद्यान अधिक्षक यांचेकडून प्रमाणपत्र. महापालिकेच्या फळे, फुले व भाजीपाला प्रदर्शन तसेच सुशोभिकरणामध्ये सक्रिय सहभाग.

**श्री.काळूराम दत्तू लोखंडे, बिगारी, नगररोड क्षेत्रिय कार्यालय** - बिगारी पदावर ७ वर्षे कार्यरत. प्रामाणिक, निर्व्यसनी व कष्टाळू कर्मचारी. अतिक्रमण विभागात धडाडीने काम करण्यात हातखंडा. पुणे महानगरपालिकेत कार्यरत असताना हरियाना व पंजाब येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावर कुस्ती पंच म्हणून नावलौकीक.

**श्रीमती सविता नामदेव पारधे झाडूवाली, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय** - झाडुवाली या पदावर १२ वर्षे कार्यरत. प्रामाणिक व कार्यक्षम कर्मचारी. कामगार युनियनने राबविलेल्या गणित विज्ञान प्रकल्पात मुला-मुलींना भाग घेण्यास प्रवृत्त करण्यास मदत. व्यसनमुक्ती कार्यक्रमात सक्रिय सहभाग. महिला आरोग्य हक्क परिषद यांचेतर्फे सन्मानित.

**श्री.नामदेव खंडू लोंढे, ड्रेनेज बिगारी, घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय** - ड्रेनेज बिगारी या पदावर २१ वर्षे कार्यरत. प्रामाणिक व कार्यक्षम कर्मचारी. पुरस्काराचे आर्थिक वर्षामध्ये शंभर टक्के हजेरी. ड्रेनेजमध्ये उतरुन अतिशय जोखमीचे काम प्रामाणिकपणे काम करतात. सामाजिक कर्तव्याच्या जाणीवेतून व्यसनमुक्तीविषयी जनजागृती कार्यात सक्रिय सहभाग. माझे पुणे-स्वच्छ पुणे अभियानात सहभाग. रक्तगट तपासणी, स्वच्छता मोहिम, वाचनालय उद्घाटन इ. सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग. सामाजिक कार्याबद्दल सामाजिक संस्थाकडून सन्मानित.

**श्रीमती मिना नंदकुमार खवले झाडूवाली कोथरुड क्षेत्रिय कार्यालय** - झाडुवाली या पदावर २० वर्षे कार्यरत. प्रामाणिक, कष्टाळू व कार्यक्षम कर्मचारी. पुरस्काराचे आर्थिक वर्षामध्ये शंभर टक्के हजेरी. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानामध्ये सक्रिय सहभाग. पुणे मनपा कामगार युनियन व पुणे मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने गणित, विज्ञान रामानुजन प्रकल्पात ५ मुलांना सहभाग घेण्यास प्रवृत्त केले. महिला आरोग्य हक्क परिषद यांचेतर्फे सन्मानित.

**श्री.दिलीप राजाराम बडदे असिस्टंट टिनस्मिथ, व्हेईकल डेपो कार्यालय** - हेल्पर ते असिस्टंट टिनस्मिथ या पदावर २९ वर्षे कार्यरत. प्रमाणिक, कष्टाळू, नियमित व कार्यक्षम कर्मचारी. पुरस्काराचे आर्थिक वर्षामध्ये शंभर टक्के हजेरी. महानरगपालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग. व्हेईकल डेपो मध्ये कार्यरत असताना नेत्रदान शिबिर, योगासन शिबिर, योग अभ्यास यामध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग.

# विशेष कामगिरी पुरस्कार सन २००९-२०१०

**श्री.सुरेश नरसिंग जगताप, सह महापालिका आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन)**

कनिष्ठ अभियंता ते सह महापालिका आयुक्त असा प्रवास. आदर्श क्षेत्रिय अधिकारी पुरस्काराने सन्मानित. जनगणना कार्यासाठी रौप्यपदक प्रदान. कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी शासनाकडून ३ जागा मिळविण्यात यश. शहरामध्ये बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करुन हद्दीमध्ये कचरा जिरविण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी. कचरा डेपोवरील ओपन डंपिंग पूर्णपणे बंद केले. देवाची उरळी/फुरसुंगी येथील यापूर्वी साठवलेल्या कचऱ्यावर कॅपिंग करण्यास सुरवात केली. कात्रज प्रभाग शुन्य कचरा प्रभाग केला. दोन बायोगॅस प्रकल्पांना आय.एस.ओ. मानांकन प्राप्त करुन दिले. शहर स्वच्छता आराखडा तयार केला. संत गाडगेबाबा अभियानाचा दोन वेळा पुरस्कार प्राप्त. आरोग्यविषयक उपविधी तयार केले. कचऱ्यापासून विजनिर्मिती प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरु केला. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी गांडूळखत, मॅकेनिकल कंपोस्ट खत इ. प्रकल्प सुरु केले.

**प्रकाश शंकरराव हुरकडली, विद्युत पर्यवेक्षक**

असिस्टंट इलेक्ट्रिशियन ते विद्युत पर्यवेक्षक असा प्रवास. उपाध्यक्ष, पुणे महानगरपालिका कामगार युनियनचे ३४ वर्षे कार्यकारिणी सदस्य. महापालिकेमध्ये सांस्कृतिक मंचाची स्थापना केली. सन २००६ रोजी भारतीय दलित साहित्य अकादमी यांचा बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप राष्ट्रीय पुरस्काराने. कामगारांचे सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम भरविणे, कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य तसेच कौटुंबिक समस्यांच्या बाबतीत मार्गदर्शन करणेकामी पुढाकार. रक्तदान, पुणे फेस्टिव्हल, पुणे नवरात्र महोत्सव, शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सव, पुणे मनपा वर्धापन दिन, कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग.

# सन २०१०-२०११

**श्री.माधव नारायण देशपांडे, महापालिका सहाय्यक आयुक्त**

कनिष्ठ अभियंता ते महापालिका सहाय्यक आयुक्त असा प्रवास.

१९८० साली पदविका (स्थापत्य)संपादन केली. ऑक्टोबर,१९८० मध्ये सिडको येथे नोकरीस रुजू झाले. जून, १९८५ पासून पुणे महानगरपालिकेमध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून कामावर रुजू झाले. त्या काळात ड्रेनेज, जलोत्सारण, बांधकाम नियंत्रण, पाणीपुरवठा इ. विभागात काम केले. १९९९ पासून ते महापालिका सहाय्यक आयुक्त या पदावर कार्यरत आहेत. क्षेत्रिय कार्यालयाकडे कार्यरत असताना संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, निवडणूक, इतर शासकिय योजना यशस्वीपणे राबविले.


डॉ. राजेंद्र जोशी


श्री. संजय घावटे


श्री. गुरुस्वामी तुम्माले


श्री. लक्ष्मण कादबाने


श्रीमती वर्षा मगदूम


श्रीमती अनुराधा कोकरे


श्री. संदीप मोरे


श्री.रमेश जाधव


श्रीमती रतनबाई धिमधिमे


श्री. रविकांत चव्हाण


श्री. राजेंद्र गायकवाड


श्रीमती प्रमिला दळवी


श्री.संतोष घोटकुले


श्री. विलास ढोबळे


श्री.काळूराम लोखंडे


श्रीमती सविता पारधे


श्री.नामदेव लोंढे


श्रीमती मीना खवले


श्री. दिलीप बडदे


श्री. सुरेश जगताप


श्री. माधव देशपांडे


श्री. प्रकाश हुरकुडली

## सेवकाचा मोबाईल फोन...

घर संसाराची चिंता, घोर जीवाला
मोबाईल फोन माझ्या उशाला
बघ मोबाईलची बेल झाली
पाण्याची तक्रार आली
किक मार तुझ्या गाडीला
मोबाईल फोन माझ्या उशाला
माननियांचा आला फोन
खड्डे पडलेत रस्त्यात दोन
सांग लगेच तुझ्या मुकादमाला
मोबाईल फोन माझ्या उशाला
नागरिकाने दिली तक्रार.
तिथं चेंबर वहातोय फार
शोधा मिस्त्री अन राडीला
मोबाईल फोन माझ्या उशाला

मास्तराचं पत्र आलं
वर्गाचं दार तुटलं
लाव ॲटम तुझ्या सुताराला
मोबाईल फोन माझ्या उशाला
सहा वाजता हजेरी झाली
घंटागाडी ती बग आली
बेल नाही समोरच्या दाराला
मोबाईल फोन माझ्या उशाला
पहिला पाउस ढगांचा गडगडाट
पडले रस्त्यात आडवे झाड
दूरध्वनी केला ठेकेदाराला
मोबाईल फोन माझ्या उशाला

दिली साहेबांनी वर्दी
फाईलची झाली गर्दी
दे उत्तर आल्या मेमोला
मोबाईल फोन माझ्या उशाला
कार्यकर्त्याने दिला आवाज
काढीन म्हणे मोर्चा आज
नाही वाली त्या झोपडपट्टीला
मोबाईल फोन माझ्या उशाला
तक्रारींचा वाचून पाढा
अण्णा भाउंनी केला राडा
बस हिरवळीवर उपोषणाला
मोबाईल फोन माझ्या उशाला

श्री. झुळूक अशोक,
कनिष्ठ अभियंता

## मला वाटते...

वृक्षासम मी होउनी थोर
धरावी सर्वांवर छाया
माता करते बाळावरती
तशी करावी माया
मला वाटते होउनी वारा
आकाशी सैर कराया
लहान थोरा उडवित न्यावे
तुम्हासारखा फुलपाखरा
मला वाटते होउनी पर्वत
ढगांना अडवूनी धरावे
घेउनी अमृत त्यांच्या कडनं
ते सर्वांना वाटूनी द्यावे
मला वाटते होउनी माता (भूमी)
हिरवी साडी परिधान करावी
व्याकूळ झाली लेकरे आता
पर्जन्यांनी बरसात करावी
मला वाटते दिपक होउनी
अंधार सारा दूर करावा
अंत माझा ऐसा व्हावा
हेची मागणे आता देवा

दिपक नारायण चव्हाण
मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय


कल्याणवार्ता
नोव्हेंबर, २०१२
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## माहे नोव्हेंबर, २०१२ सेवापूर्ती समारंभ

दिनांक ३०/११/२०१२ रोजी कॅ. वडके हॉल येथे नोव्हेंबर, २०१२ मधील सेवानिवृत्त ३३ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित



केला होता. यामध्ये १९ वयोपरत्वे व १४ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता, बांधकाम विकास, मा. अरुण खिलारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. गोडबोले सेवानिवृत्त सेवक संघ प्रतिनिधी हे उपस्थित होते.

प्रास्ताविकात मा.अरुण खिलारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. खरवडकर यांनी महापालिकेची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचे महापालिकेतर्फे आभार मानले व माझ्या खात्याकडील सर्व सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मिळणारे सर्व फायदे सेवानिवृत्तीचे वेळी देणेबाबत प्रत्यनशील राहील, अशी ग्वाही दिली व सर्व सेवानिवृत्त सेवकांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यकांत चांदेरे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी केले.

## निस्वार्थपणे केलेले काम उत्कृष्ट

पुष्कळांचे म्हणणे असे आहे की, काही हेतूशिवाय कार्यच करता येत नाही. निस्वार्थपणे झालेले कार्यच त्यांनी पाहिलेले नसते.

हालाशेविना काम करणारा तो आदर्श कर्मयोगी होता. सूर्य सागरापासून पाणी घेतो आणि ते पर्जन्याच्या रुपाने परत करतो. तुम्ही असेच देवघेव करणारी यंत्र आहात. देता येण्यासाठी तुम्ही घेता तेंव्हा परत मिळण्याची अपेक्षा न करता देत राहा. जेवढे तुम्ही जास्त द्याल, तेवढे अधिक तुमच्याकडे येईल. जेवढ्या वेगाने तुम्ही खोलीतील हवा काढून टाकाल, तितक्याच झपाट्याने ती बाहेरच्या हवेने भरुन जाईल. पण तुम्ही जर खोलीची दारे कडेकोट बंद करुन टाकली तर आतले आतच राहील, पण बाहेरचं काही आत येणार नाही आणि आत जे आहे ते कुजून विषारी होवून जाईल. नदी स्वत:ला सागरात सतत ओतत असते आणि सतत भरली जात असते. तेंव्हा सागरास मिळण्याचे थांबवू नका. ज्या क्षणी ते थांबवाल त्याच क्षणी मृत्यू तुमच्यावर धाड घालील.

स्वामी विवेकानंद